२. उपप्रकल्पाच्या जलदगतीने कार्यान्विय होणेकरिता CBO (समुदाय आधारित संस्था) यांनी Project Estimate च्या आधारे कोणत्याही शेड्यूल्ड /राष्ट्रीयकृत बँकेकडे कर्ज पुरवठया करीता प्रस्ताव सादर करण्याची समांतर प्रकिया राबवावी.

३. राष्ट्रीयकृत / Schedule बँकेचे मुदत कर्जासंबंधिचे तत्वत: मंजुरी पत्र व सविस्तर Bank appraisal note सादर करावयाची आहे.

**४. ज्या उपप्रकल्पांचे प्रकल्पमुल्य रक्कम रु.११२.५० लाख पेक्षा जास्त आहे त्या उपप्रकल्पासाठी CA Certified Net Worth certificate जोडणे आवश्यक राहिल.**

तसेच केंद्र शासनाच्या अन्न प्रक्रिया उद्योग विभाग नवी दिल्ली यांचे कार्यालयाने निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सुचना दि. ८/६/२०२२ अन्वये **प्रधानमंत्री किसान संपदा योजना** अंतर्गत "एकात्मिक शित साखळी आणि मुल्यवृध्दी व पायाभुत सुविधा" यामध्ये "The combined net worth of the applicant should be at least 1.5 times of the grants-in-aid-sought for from the Ministry in respect of General Areas and at least equal to the grants-in-aid-sought for from the Ministry in respect of Difficult Areas or proposals from SC/ST or Farmer Producer Organisations or Self-Help Groups" असे नमूद आहे. तसेच "In case of newly formed companies, net-worth of individual promoter (s)/ director (s)/ shareholders (s) will be considered to assess the combined net-worth." असा उल्लेख आहे. यास्तव स्मार्ट प्रकल्पातंर्गत प्रकल्प यशस्वीतेसाठी यापुढे ज्या उपप्रकल्पांचे प्रकल्प मुल्य रक्कम रु.११२.५० लाख पेक्षा जास्त आहे, अशा प्रकल्पासाठी CA certified "Net Worth Certificate" व इतर आर्थिक निकषांचा विचार करून व्यवहार्य अनुदान मंजूर करण्यात येईल.

एकूणत: या स्मार्ट प्रकल्पात अनुदान ६० टक्के असल्याने अनुदान मुल्य हे जास्तीत जास्त "Net Worth Certificate" इतके अनुदान (फलोत्पादन आणि कापूस उपप्रकल्पासाठी रक्कम रू. ३.०० कोटी व इतर पिकांच्या उपप्रकल्पासाठी रक्कम रू. २.०० कोटी मर्यादेत) मंजूर केले जाईल. या व्यतिरीक्त आवश्यक प्रकल्प मुल्य / भांडवल उभारण्याची जबाबदारी ही संबंधीत समुदाय आधारीत संस्थेची राहिल.

५. उपप्रकल्पास प्रकल्पाच्या निकषांनुसार (cost norm and eligibility of component) देय होणारी (६०%) अनुदान रक्कम अथवा बँकेकडून मंजुर होणाऱ्या कर्ज रकमेच्या दुप्पट रक्कम यापैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम (इतर पिकांच्या उपप्रकल्पासाठी रक्कम रू. २.०० कोटी व फलोत्पादन आणि कापूस उपप्रकल्पासाठी रक्कम रू.३.०० कोटी मर्यादेत) प्रकल्पाच्या अटी व शर्ती यांची पुर्तता झालेनंतर (FPP sanction) पीसीएमयु कार्यालयाकडून अनुदान स्वरूपात देणेत येईल.